नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २३/०३/२०२६ (सोमवार )

# नागपुर ग्रामीण पोलीसांनी ऑपरेशन शोध III मोहीमे अंतर्गत एकुण ८५ जणांचा घेतला शोध

मा. अपर पोलीस महासंचालक, महीला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाने दिनांक ०६/०३/२०२६ ते २२/०३/२०२६ या कालावधीत संपुर्ण राज्यात हरवलेल्या महीला तसेच अल्पवयीन बालकांचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन **शोध III ही** शोध मोहीम राबवण्यात आली होती. नागपुर ग्रामीण जिल्हयात नमुद मोहीमे अंतर्गत बेपत्ता महीला/अल्पवयीन बालकांचा शोध घेण्याकरीता विविध शोध पथके नेमुन यशस्वीरित्या ऑपरेशन **शोध III ही** शोध मोहीम पार पाडण्यात आली.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण, जिल्हा यांच्या मार्गदर्शनात या मोहिमेचे नेतृत्व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी केले असुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभाग, नागपुर ग्रामीण यांचे पथक तसेच प्रत्येक पोलीस स्टेशनला १ असे एकुण २२ मिसींग शोध पथक स्थापन करण्यात आले होते. स्थापन केलेल्या विविध पथकांनी तांत्रिक पुरावे तसेच गुप्तबातमीदार यांच्या मदतीने बेपत्ता महीला/ अल्पवयीन बालकांचा कसुन शोध घेतला. **“ ऑपरेशन शोध III ” मोहीमे** अंतर्गत दिनांक ०६/०३/२०२६ ते २२/०३/२०२६ रोजी पर्यंत अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभाग, नागपुर ग्रामीण, भरोसा सेल, नागपुर ग्रामीण आणि नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन यांनी सातत्याने पाठपुरावा करीत **सन २०२१ पासुन बेपत्ता ८० महीला, ४ अल्पवयींन बालीका, रेकॉर्ड व्यतिरिक्त १ अल्पवयीन बालक अशा ८५ जणांचा शोध घेतला .**

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
# वाहनासह ४५ लाख ५५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
# वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :– दिनांक २३/०३/२०२६ रोजी वडोदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा ते नागपूर रोडने ट्रकमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा वडोदा येथील झुल्लर फाटा येथे एन एच –५३ महामार्गावर नाकाबंदी केली असता संशयित ट्रक एम एच–४० सी टी–९७३६ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रकचा **चालक नामे नकुल सिताराम कनोजिया, वय २४ वर्ष, रा. फ्लॅट नं. बी–६, आर के नगर, अपार्टमेंट झिंगाबाई टाकळी, मानकापूर नागपूर हा मिळुन आला.** पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन **१)** ट्रक एम एच–४० सी टी–९७३६ किंमती ४५,००,०००/–रूपये २) १० ब्रास रेती किंमती ५५,०००/– रूपये असा **एकुण ४५,५५,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी आरोपी वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोस्टे वडोदा येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं, सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द ०२ गुन्हे नोंद काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक २२/०३/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, भाजीपाणी येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे काटोल पोलीसांनी दोन ठिकाणी कारवाई करून खालील प्रमाणे २ गुन्हे नोंद केले.

**कारवाई क्रं १** :— आरोपी नामे १) राजकुमार महादेव धूर्वे, वय ६० वर्ष, रा. प्लॉट ६६, अमर संजय सोसायटी मनीष नगर, सोमलवाडा वर्धा रोड, विवेकानंद नगर नागपूर ०२) किशोर सुरेशरावजी चौरघडे, वय ३० वर्ष, रा. सोनोली, ता. काटोल ह. मु. डायमंड नगर नागपूर ३) बालचंद्र रमेश मानवटकर, वय ४० वर्ष, रा. बुध्दविहार जुनीवस्ती, खामला नागपूर ४) गोपाल परसरामजी गजबे, वय ४३ वर्ष, रा. वर्धा रोड, न्यू हनुमान मंदीरजवळ, राहुल नगर, सोमलवाडा नागपूर यांच्यावर कारवाई करत ५२ तास पत्ते आणि ९५५० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रं २ :—** आरोपी क्रं १) कैलाश व्यकंटजी ढोके, वय ५० वर्ष, भाजीपाणी ता. काटोल २) सतीश एकनाथ पाटील, वय ४८ वर्ष, रा. सोमलवाडा, राहुल नगर, त. जि.

नागपूर ३) दारासिंग दशरथ शिरसाठ, वय ५४ वर्ष, रा. राहुल नगर, त. जि. नागपूर ४) किरण ताराचंद कांबळे, वय ४९ वर्ष, रा. सोमलवाडा, उज्वल नगर, त. जि. नागपूर यांचेवर कारवाई करत ५२ तास पत्ते आणि ७८८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **दोन्ही कारवाईमध्ये पोलीसांनी पंचासमक्ष ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम १७,४३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणाऱ्या, तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २२/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री तसचे सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन **मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण ४,९८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.** महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे लंकेश शंकर माहुरे, वय २९ वर्ष, रा. तेलगखेडी, ता. पारशिवनी याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे शैलेश शामलाल आत्राम, वय ३५ वर्ष, रा. वरघाट, ता. रामटेक याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे सनिदेव अमत मारवाडी, वय ३९ वर्ष, रा. तिडंगी, ता. कळमेश्वर याचेवर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे मंगेश धनराज खांडसकर, वय ४० वर्षे, रा. खरसोली, ता. नरखेड याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे जगदीश दादा पवार, वय ४५ वर्ष, रा. हिवरमठ, ता. नरखेड याचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे गणेश जग्गनाथ रेवतकर, वय ५१ वर्ष, रा. दुर्गा नगर कारंजा, ता. कारंजा, जि. वर्धा याचे वर एक गुन्हा नोंद, अशा एकुण ०७ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०७ गुन्हे दाखल केले आहे.

नमुद कारवाईत एकुण १) ३५ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ३३३० मिली देशी दारू असा एकुण ४,९८०/—रूपयांचा मुद्देमाल मिळुन आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने